**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी**
**पिंपरी – ४११ ०१८.**
**वैद्यकीय विभाग, मुख्य कार्यालय**
**उमेदवारांना सुचना**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत स्त्रीरोगतज्ञ, बालरोग तज्ञ, भूलतज्ञ, वैद्यकिय अधिकारी (पूर्ण वेळ), गुणवत्ता आश्वासक सहाय्यक, स्टाफनर्स, फार्मासिस्ट, लॅब टेक्निशियन या पदाच्या मुलाखती दि.२६/११/२०२१ रोजी प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे घेण्यात आलेल्या होत्या.

सदर भरती कामी गठित निवड समितीने शिफारस केल्यानुसार निवड व प्रतिक्षा यादी महापालिका संकेतस्थळावर दि.१४/१२/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर निवड यादी मधील निवड झालेले उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिक्षा यादी मधील उमेदवारांनी नियुक्ती आदेश स्वीकारणेकामी व रुजू होणेकामी आदेशाच्या दिनांकापासून पुढील ०७ दिवासामध्ये - सकाळी १०.०० ते ५.०० या कालावधीत (सुटीचे दिवस वगळून) पिंपरी चिंचवड महानगरपालिका भवन, वैद्यकिय विभाग, २ रा मजला पिंपरी-१७ येथे स्वत: हजर राहावे.

(डॉ.पवन साळवे)
वैद्यकिय संचालक
तथा
अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

क्र.वैद्य/९ड/कावि/ ८८९ /२०२२
दिनांक-१९/ ०४/२०२२

वाचले – १. मा. आयुक्त (कु.क.) व संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, यांचेकडील दि.५ जून २०१६ चे पत्र.

२. जाहिरात क्र.११८९/२०२१ दि.१५/११/२०२१

३. दि. १४/ ०४/२०२२ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे -४११ ०१८.

वैद्यकीय विभाग मुख्य कार्यालय,

क्र.वैद्य/ ९ /कावि / ८८८/२०२२

दिनांक - १२/०४ /२०२२

विषय – राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) अंतर्गत दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी स्वरुपात तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्तीबाबत...

आदेश,

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत एकत्रित मानधनावर वाचले क्र.१ ते २ अन्वये स्त्रीरोगतज्ञ, बालरोग तज्ञ, भूलतज्ञ, वैद्यकिय अधिकारी (पूर्ण वेळ), गुणवत्ता आश्वासक सहाय्यक, स्टाफनर्स, फार्मासिस्ट, लॅब टेक्निशियन या पदांची भरती करणेकामी वृत्तपत्र व म.न.पा. वेबसाईटवर जाहीरात देऊन दि.२६/११/२०२१ रोजी उमेदवारांच्या थेट मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. थेट मुलाखतीसाठी गठित केलेल्या निवड समितीने शिफारस केल्यानुसार आरक्षण निहाय निवड झालेल्या व गुणानुक्रमे पात्र ठरलेल्या उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी करणेत आलेली असुन निवड यादी मधील उमेदवारांना सोबत जोडलेल्या " प्रपत्र अ " प्रमाणे आपल्या नावासमोर नमुद केलेल्या प्रवर्गामधील पदावर दरमहा एकत्रित मानधनावर नमुद कालावधीसाठी नेमुन दिलेल्या विभागात तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यात येत आहे.

तसेच बालरोगतज्ञ या पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी/डी.एन.बी. (बालरोग) पदवी परिक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे असे जाहिरातीमध्ये नमूद आहे. परंतु सदर भरती प्रक्रियेच्या दरम्यान अ.जाती या प्रवर्गामधून एम.डी/डी.एन.बी. (बालरोग) पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार उपलब्ध झालेले नाहीत.

त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या उद्दिष्ट पुर्तीकामी बालरोगतज्ञ यांची आवश्यकता विचारात घेता अ.जाती या प्रवर्गातून बालरोगतज्ञ या पदाकरीता नवीन जाहिरात देवून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत सदर भरती प्रक्रियामध्ये DCH शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेले उमेदवार डॉ.धोंगडे सुबोध बाबुराव, बालरोगतज्ञ यांना नवीन जाहिरात देवून उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिने कालावधीकरीता जे आगोदर होईल तोपर्यंत नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

अटी व शर्ती –

१. सदरची नियुक्ती राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कामकाजासाठी राहील. सदर पदांचा पिंपरी चिंचवड म.न.पा.अस्थापनेशी कसल्याही प्रकाराचा संबंध राहणार नाही.

२. सदरची नियुक्ती निव्वळ कंत्राटी पध्दतीने केवळ "प्रपत्र अ" मध्ये नमुद कालावधी पुरती असुन प्रकल्प बंद होताच सदरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

३. सदरची नियुक्ती पुर्णपणे तात्पुरत्या (हंगामी) स्वरुपाची असुन त्यामुळे उमेदवारास कायमपदी नियुक्तीचा हक्क सांगता येणार नाही. ज्या दिवशी कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ एण्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी पीसीएमसीला सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय मानधनावरील सेवा समाप्त केली जाईल.

४. मानधनावरील सेवा कालावधीत आपणांस उपस्थित दिवसांचे एकवट मानधन विहीत केलेनुसार देण्यात येईल व नियमानुसार एकत्रित मानधनातुन आयकर व व्यवसाय कर कपात करणेत येईल. तसेच मनपाच्या इतर कर्मचा-यांना लागू असणा-या इतर सुविधा, हक्क व आर्थिक लाभ मिळणार नाहीत.

५. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत शासनाकडुन वेळोवेळी प्राप्त होणा-या सुचना व अटी आपणास लागू होतील.

६. सदरची पुनर्नियुक्ती प्रकल्प अंमलबजावणी आराखडा २०२२-२३ च्या मंजुरीच्या आधीन राहून देण्यात येईल. केंद्र शासनाने सन २०२२-२३ करीता कोणत्याही पदास मान्यता दिली नाही. तर भविष्यात इतर कोणतीही अपवादात्मक परिस्थीती उदभवल्यास सदर पदावरील कर्मचा-यांची सेवा कोणतीही पूर्वसुचना वा कोणतेही कारण न देता तात्काळ संपुष्टात आणली जाईल.

७. राज्य स्तरावरुन आदेश प्राप्त होईपर्यंत कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांना सध्याच्या मानधनावर वार्षीक मानधनवाढ देण्यात येणार नाही.

८. आठवड्यातुन फक्त एक दिवस रुग्णालयाच्या सोयीनुसार साप्ताहीक सुट्टी राहील व शासन निर्णयानुसार सार्वजनिक सुट्टी देय राहील. नेमणुक कालावधी नुसार ( दिड महिन्यातुन १ या प्रमाणे) ८ दिवसाची किरकोळ रजा व ७ दिवसांची वैद्यकिय रजा देय राहतील या व्यतीरिक्त कोणतीही रजा अनुज्ञेय असणार नाही. सार्वजनिक सुटटीच्या दिवशी बाह्यरुग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्या दिवसाची सार्वजनिक सुट्टी उपभोगता येईल.(सार्वजनिक सुट्टी किंवा साप्ताहीक सुट्टीचे दिवशी सदर कर्मचारी कामावर हजर असेल तर त्यास त्या दिवसाची पर्यायी रजा नियुक्त कालावधीमध्ये देय राहील परंतु सार्वजनिक/साप्ताहीक सुट्टीचे दिवशीचा दप्तरी आदेश नियंत्रणप्रमुख यांचे स्वाक्षरीने काढणेत यावा.)

९. कामकाजाची वेळ दवाखाना/रुग्णालयाच्या वेळापत्रकानुसार व रुग्णालयीन कामकाजाचे सोयीनुसार राहील.

१०. मानधनावरील पदाचे कामकाज नेमणुक देणेत आलेल्या दवाखाना/रुग्णालय यांचे कार्यक्षेत्रात राहील व त्यावर संबधित प्रभारी वैद्यकीय अधिकारी/नियंत्रण अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

११. मानधनाचे पदावर काम करताना आपणाकडुन सर्वांना नि:पक्षपातीने वागणुक मिळणे आवश्यक आहे. कामासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहील.

१२. मानधनावरील नियुक्त केलेल्या पदाचे काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पुर्वसुचना कार्यालयास देणे आपणावर बंधनकारक राहील अन्यथा मागिल एक महिन्याचे वेतन अदा केले जाणार नाही.

१३. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना राजीनामा देण्याची इच्छा झाल्यास त्यांनी एक महिना मुदतपूर्व लेखी सूचना देणे अथवा एक महिन्याचे मानधन कॉर्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ ऍन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी पीसीएमसी यांचे नावे जमा करणे करारपत्रातील अटीनुसार बंधनकारक आहे.

१४. एखाद्या कंत्राटी कर्मचा-यावर फसवणुकीचा अथवा फौजदारी गुन्हा दाखल झाल्यास अथवा सदर कर्मचा-यास कोणत्याही कारणास्तव ४८ तास तुरुंगवासाची शिक्षा झाली असल्यास कर्मचा-याची नियुक्ती त्वरीत संपुष्टात आणली जाईल.

१५. आपले काम असमाधानकारक, सात दिवसापेक्षा जास्त दिवस किंवा सतत विना परवाना गैरहजर असलेस किंवा नियुक्ती कालावधी संपण्यापुर्वीच विना परवाना सेवा सोडणे असे वर्तन आढळल्यास अथवा सेवेची मनपास आवश्यकता नसलेस कोणतीही पुर्वसुचना न देता आपणास मानधनावरील नियुक्तीच्या पदाच्या जबाबदारीतुन मुक्त करणेत येईल.

१६. आपणास एकत्रित मानधनाव्यतिरीक्त अन्य कोणतेही फायदे मिळणार नाहीत.

१७. नियंत्रण प्रमुखांचे सुचनेनुसार आवश्यकतेप्रमाणे कामकाज करणे बंधनकारक राहील.

१८. शासनाकडील प्राप्त करारपत्राच्या नमुन्यामध्ये रक्कम र.रु. १००/- स्टॅमपेपरवर दोन साक्षीदारांच्या स्वाक्षरी सहीत करारनामा रुजु होताना लिहुन द्यावा लागेल तरच त्यांचे पुढील महिन्याचे मासिक मानधन अदा केले जाईल.

१९. उमेदवाराने सदर आदेशाच्या दिनांकापासुन ७ दिवसाचे आत पिंपरी चिंचवड महानगरपालिका वैद्यकीय मुख्य कार्यालय, २ रा मजला पिंपरी १८ येथे रुजू व्हावे, उमेदवार मुदतीत रुजू न झालेस निवड समितीने तयार केलेल्या प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारांना नेमणूक देणेत येईल याची नोंद घ्यावी.

14/4/22

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,

श्री / श्रीमती ----------------------------------------------------------

प्रत,

जेष्ठ/प्रभारी वैद्यकिय अधिकारी.................................. रुग्णालय/दवाखाना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी -४११ ०१८

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नियुक्ती आदेश " प्रपत्र अ "

(आदेश क्र.वैद्य/९/कावि/ ८८८ /२०२२ दिनांक- १९/ ०४ /२०२२ चे लगत )

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पदनाम | प्रवर्ग | मानधन र.रु. | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.ठाकूर चैताली विनायक | स्त्रीरोगतज्ञ | खुला | ७५,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |
| २ | डॉ.लाटणे सुरेश संतराम | बालरोग तज्ञ | खुला | ७५,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |
| ३ | डॉ.काळे मोहिनी अर्जुन | वैद्यकिय अधिकारी | खुला | ६०,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |
| ४ | डॉ.रुम पुजा किशोर | वैद्यकिय अधिकारी | खुला | ६०,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |
| ५ | डॉ.क्षिरसागर देवश्री अनिरुध्द | वैद्यकिय अधिकारी | खुला | ६०,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |
| ६ | श्री.शिरसट आकाश विश्वनाथ | स्टाफनर्स | ईडब्लुएस | २०,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |
| ७ | श्रीम.तेली राजकन्या महादेव | स्टाफनर्स | इमाव | २०,०००/- | दि.१९/०४ /२०२२ ते दि.१८/03 /२०23 |

(राजेश पाटील)

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी-४११ ०१८